# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २७९/२०२३**

**संदर्भ :- जा.क्र.पोउआ/विशा/विद्यार्थी/११७६६/२०२३, पोलीस उप आयुक्त विशा-१, पुणे शहर, दिनांक ०७/११/२०२३.**

**०१.** या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येत आहे की, मा.संदिप कर्णिक, पोलीस सह.आयुक्त, पुणे शहर यांचे **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधक आदेश** संदर्भान्वये निर्गमित झालेले आहेत. (सोबत प्रत जोडली आहे.)

**०२.** तरी सर्वांनी संदर्भिय प्रतिबंधक आदेशाचे अनुपालन करावे, ही विनंती. तसेच विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थीनीं, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठ आवारात राहणारे रहिवाशी यांनी आपले ओळखपत्र सोबत बाळगावे.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. : एएन/३७५६.**
**दिनांक : ०९ नोव्हेंबर, २०२३.**

**सोबत :- वरीलप्रमाणे.**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग,
२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग,
३. मा. सर्व संचालक, प्रशाला,
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये,
५. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था,

(१ ते ५ :) सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा ही विनंती.

६. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल, - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. मा. अध्यक्ष, सर्व संघटना,
८. मा. नागरिक, अभ्यागत.

जा.क्र पोउआ/विशा/**विद्यार्थी**/११७६६/२०२३
पोलीस उप आयुक्त विशा-१, पुणे शहर
दिनांक :-०७/११/२०२३

**विषय** :- सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ परिसरात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधक आदेशाबाबत.

**आदेश**

ज्याअर्थी डॉ. प्रफुल्ल पवार कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ यांनी वपोनि चतुःश्रृंगी पो.स्टे.पुणे यांना दिलेल्या पत्रान्वये सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ हे देशातील नामांकित विदयापीठ असून देशातील तसेच आंतरराष्ट्रीय विदयार्थी विदयापीठामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रवेशित झालेले आहे. अर्थातच या विदयार्थ्यांना शिक्षणास पूरक सौदार्हपूर्ण व शांततामय वातावरणाची आवश्यकता असते. मात्र गेल्या काही दिवसात विदयापीठाच्या बाहेरील व्यक्ती व संघटना यांनी विदयापीठाचे अथवा पोलीसांची पूर्व परवानगी न घेता मोर्चा, आंदोलने, निदर्शने यांचे विदयापीठाच्या आवारामध्ये आयोजन करुन तसेच विदयापीठ आवारातील महापुरुषांच्या पुतळयांचे परिसरात विविध प्रकारच्या वंदनांचे आयोजन करुन त्यामध्ये विदयापीठाबाहेरील व्यक्तींना मोठया प्रमाणावर आमंत्रित करुन जमावाने भाषणे, घोषणा आदिंद्वारे सार्वजनिक शांततेचा भंग करुन शैक्षणिक वातावरण बाधित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विदयापीठाच्या शैक्षणिक कार्यात व्यत्यय निर्माण होऊन अनेकवेळा त्याचे परिवर्तन भांडणे, मारामारी इत्यादीमध्ये झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. यासंदर्भात पोलीसांकडे अनेक तक्रारी /एफ.आय.आर. दाखल झालेल्या आहेत. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ याठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना शिक्षणास पूरक सौदार्हपूर्ण व शांततामय वातावरणाची आवश्यकता असल्याने सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे व त्याच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी **संदिप कर्णिक, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर**, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की,

१. **सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे** हा परिसर व त्याचे सभोवतालच्या १०० मीटर परिसरात विदयार्थ्यांशिवाय इतर इसमांना एकत्र जमण्यास किंवा विदयापीठात प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.
२. **सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे** परिसरात दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात येत आहे. सदरचा आदेश संबंधीत विदयापीठातील विदयार्थी व शिक्षक/कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी/सुरक्षा अधिकारी यांना लागु होणार नाहीत.
३. सदर विदयापीठ परिसरात ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.
४. सदर विदयापीठ परिसरात कोणताही आक्षेपार्ह, दोन गटात वाद निर्माण होईल असा मजकूर लिहिण्यास, अगर छापील मजकूर चिटकविण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरचा आदेश **दि. ०७/११/२०२३ रोजी पासून ते दिनांक २१/११/२०२३ रोजीपर्यंत** अंमलात राहील. सदरच्या आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती भादवि कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज दिनांक ०७/११/२०२३ रोजी दिला आहे.

ठिकाण - पुणे शहर
दिनांक :- ०७/११/२०२३

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

( संदिप कर्णिक )
पोलीस सह.आयुक्त,
पुणे शहर